# GANESHA ECOSPHERE LTD.

GESL/2018-19/

July 9, 2018

To,
The BSE Limited,
Corporate Relationship Department,
1st Floor, New Trading Wing,
Rotunda Building,
PJ Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai-400 001.
Fax No.: 022-22723121, 22722037
Scrip Code: 514167

To,
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza,
Bandra- Kurla Complex,
Bandra (East),
Mumbai-400051.
Tel No.: 022-26598100-8114/ 66418100
Fax No. : 022-26598237/38
Scrip Symbol: GANECOS

**Sub. : Clarification on plastic waste ban in the State of Maharashtra**

Dear Sir/ Ma'am,

This is with reference to the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018 dated 23rd March, 2018, which was further amended as per Notifications dated the 11th April, 2018 & 30th June, 2018, and clarification sought by few of our investors as to whether, the said notification brought a ban on PET Bottles and if so, the possible impact on the working of the Company, being a PET recycling company.

On combined reading of the said notifications (the copy of which is enclosed herewith), it is apparent that the ban is imposed, in the state of Maharashtra, on single use plastic commodities/plastic packaging which are non-recyclable /non-biodegradable (plastic bags, pouches, disposable plastic items to name a few) thereby causing immense damage to the environmental ecosystem.

However, no such ban has been imposed on PET bottles except for PET/PETE Bottles having liquid holding capacity of less than 200 ML.

The use, purchase, sale, storage, manufacturing and trading of PET or PETE bottles, however, has been subjected to 'Extended Producer and Sellers/ Traders Responsibility' wherein the PET/PETE Bottle manufacturers, producers, sellers and traders are required to develop "Buy Back Depository Mechanism" with a predefined buy back /refund price printed on such PET or PETE bottles.

We hope that the above clarifies the concerns of investors on the above referred matter.

Thanking you,

Yours faithfully,
**For Ganesha Ecosphere Ltd.**

**(Gopal Agarwal)**
**Chief Financial Officer**

Encl.: As above

**Regd. Office & Works :** Raipur, (Rania), Kalpi Road, Distt. Kanpur Dehat-209 304 • Tel.: +91-512-2154183 Cell : 9198708383
**Admn. Office :** 113/216-B, Swaroop Nagar, Kanpur-208 002, India • Tel.:+91-512-2555504-06 • Fax :+91-512-2555293
**E-mail :** gesl@ganeshaecosphere.com • **Website :** www.ganeshaecosphere.com • **CIN :** L51109UP1987PLC009090

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ३७] शुक्रवार, मार्च २३, २०१८/चैत्र २, शके १९४० [पृष्ठे २४, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ८१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**पर्यावरण विभाग**

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२, दिनांक २३ मार्च २०१८

**अधिसूचना**

क्रमांक. प्लास्टीक-२०१८/प्र.क्र.२४/तां.क. ४.—ज्याअर्थी, प्लास्टीकच्या वापरामुळे व विल्हेवाटीमुळे विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या, ज्यामध्ये अविघटनशील प्लास्टीक कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक अधिवास, लँड फिल साईट्स, वन्य व सागरी जीवांमध्ये असा कचरा खाल्याने किंवा त्यांच्यामध्ये अडकल्याने विविध समस्या निर्माण होऊन प्लास्टीक तयार करतांना वापरले जाणारे इतर रसायनांमुळे सागरी जीव, वन्य जीव व मानवी आरोग्यावर विपरित परिणाम करीत आहेत ;

आणि ज्याअर्थी, अशा प्लास्टीक कचऱ्यामुळे नागरी घनकचरा हाताळण्यामध्ये विविध समस्या निर्माण होऊन त्यासाठी आर्थिक भार मोठ्या प्रमाणावर लागणे, असा अविघटनशील कचरा उघड्यावर वा घनकचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी जाळल्याने मानव व प्राण्यांमध्ये विविध आजार निर्माण होणे ;

आणि ज्याअर्थी, अविघटनशील कचरा नाले व गटारात अडकल्याने शहरांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन जीवित व वित्त हानी होत असल्याचे निदर्शनास येत आहे आणि वातावरणीय बदलांमुळे नोंदविलेल्या निरिक्षणांनुसार अतिवृष्टी व त्यामुळे पूरसदृश्य घटनांच्या संख्येत वाढ होणार आहे ;

आणि ज्याअर्थी, प्लास्टीक कचऱ्यामुळे व मायक्रो प्लास्टीकमुळे सागरी जीव व तेथील जैव विविधतेवर परिणाम होण्याबरोबरच पर्यटन स्थळे, सागरी चौपाट्या, शेती, वने व परिसंस्था इ. ठिकाणी अशा अविघटनशील कचऱ्यामुळे नैसर्गिक स्त्रोतांपासून मिळणाऱ्या परिसंस्थांच्या सेवांवर

विपरित परिणाम होतो आहे व त्यामुळे अशा कचऱ्याच्या हाताळणीसाठी राज्यावर तसेच स्थानिक प्राधिकरणांवर मोठया प्रमाणावर आर्थिक भारासोबतच आरोग्य सेवांवरील वित्तीय भारसुद्धा दिवसागणिक वाढत आहे.

आणि ज्याअर्थी, अविघटनशील कचऱ्यामुळे व सुक्ष्म प्लास्टीकमुळे माशांच्या जैवविविधतेवर आणि मत्स्यव्यवसायावर विपरित परिणाम होत आहे.

आणि ज्याअर्थी, अविघटनशील कचऱ्यामुळे स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीवर सुध्दा परिणाम होत आहे.

आणि ज्याअर्थी, सर्व संबंधितांशी व विभागीय क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. तसेच वर्तमानपत्रात याबाबत जाहीर सूचनासुध्दा प्रसिध्द करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज उत्पादन व वापर) नियम, २००६ द्वारे ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्यांवर बंदी आणून देखील या कचऱ्याच्या वाढत्या प्रमाणामुळे पर्यावरणावर व आरोग्यावर होणारे नुकसान वाढतच आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोटकलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, प्लास्टीक व थर्माकॉल इत्यादीपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तूंच उत्पादन , वापर, विक्री, वाहतूक याकरिता पुढील नियमन करीत आहे :-

१. संक्षिप्त नांव व प्रारंभ :-

१) या अधिसूचनेला, महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन , वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ असे म्हणावे.

२) ही अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२. व्याख्या :-

१) "कायदा" याचा अर्थ, महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ असा आहे.

२) "प्लास्टीक" याचा अर्थ, असा पदार्थ ज्याच्या मध्ये पॉलिमर्स जसे, पॉलिइथीलीन टेट्राथॅलेट, हायडेन्सीटी पॉलिइथीलीन, व्हीनाईल, लोडेन्सीटी पॉलिइथीलीन, पॉलिप्रोपीलीन, पॉलि स्टायरीन रेझीन, पॉलि स्टायरीन (थर्माकॉल), नॉन ओवन पॉलिप्रोपीलीन, मल्टी लेअर्ड कोएक्सक्रुडर पॉलिप्रोपीलीन, पॉलिटेट्राथॅलेट, पॉलिअमाईडस, पॉलिमिथाईल, मिथॅअॅक्रीलेट व प्लास्टीक मायक्रो बिडस इ.

3) "कम्पोस्टेबल प्लास्टीक" म्हणजे असे प्लास्टीक ज्याचे जैविक पध्दतीने विघटन होऊन कार्बनडाय ऑक्साईड, पाणी, अकार्बनिक संयुगे व बायोमास तयार होतांना नैसर्गिक विघटनशील पदार्थाच्या विघटनाच्या सामान्य प्रमाणानुसार असेल व ज्याद्वारे दृश्य, घातक विषारी पदार्थांची अशा प्रक्रियेदरम्यान निर्मिती होत नाही आणि असे प्लास्टीक भारतीय मानक आयएस किंवा आयएसओ 17088:2008 मध्ये वेळोवेळी केलेल्या बदलाशी अनुरुप असतील.

4) "प्लास्टीक शिट्स" म्हणजे प्लास्टीकपासून बनविलेले शिट्स.

५) "प्लास्टीक कचरा" म्हणजे असा कचरा ज्यामध्ये वापरुन फेकलेल्या प्लास्टीक पासून बनविलेल्या वस्तूंचा समावेश आहे.

६) “पुर्नचक्रण” म्हणजे प्रकिया ज्यामध्ये प्लास्टीक कचऱ्याचे विलगीकरण करुन त्याचे नवीन वस्तू तयार करण्यासाठी किंवा कच्चा माल म्हणून उत्पादनामध्ये वापरण्यासाठी उपयोग केला जातो.

७) "**उत्पादक**" म्हणजे अशी व्यक्ती जी प्लास्टीक कॅरी बॅग्ज, अधिनियमात उल्लेखित केलेल्या प्लास्टीकपासून बनविलेल्या वस्तूंचे उत्पादन करतो किंवा निर्मिती केलेल्या वस्तूंच्या पॅकेजिंगसाठी प्लास्टीक वापरतो.

८) "वस्तू" म्हणजे प्लास्टीक किंवा थर्माकॉलपासून बनविलेली वस्तू, भांडे किंवा इतर घटक.

९) "प्लास्टीक बॅग्स " म्हणजे प्लास्टीक मटेरियल पासून वस्तुंची ने-आण करण्यासाठी किंवा वस्तू हाताळण्यासाठी किंवा पॅकेजिंगसाठी, हँडल असलेली वा हँडल नसलेली, अशी पिशवी ज्यामध्ये नॉन ओव्हन पॉलिप्रोपिलिन पासून बनविलेल्या पिशवी व ज्यामध्ये उत्पादनाच्या ठिकाणी उत्पादन प्रक्रियेदरम्यान अनिवार्य वेष्टनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक आवरण वा पिशवी यांचा समावेश आहे.

१०) “पीईटी व पीईटीई बाटल्या” म्हणजे पॉलिइथीलीन टेट्राथॅलेट (पीईटी) व पॉलिइथीलीन टेट्राथॅलेट इस्टर्स (पीईटीई) पासून बनविलेल्या बाटल्या ज्यांचा निम्नद्रवपदार्थ, द्रवपदार्थ, पाणी इत्यादी साठविण्यासाठी वापर केला जातो.

११) "थर्माकॉल पासून बनविलेली वस्तू" म्हणजे पॉलिस्टायरिन पासून बनविलेली कोणतीही वस्तू.

१२) "नमूना" याचा अर्थ, या नियमासोबत जोडलेला नमूना असा आहे.

१३) “माल” म्हणजे उत्पादनकर्त्याने प्लास्टीक किंवा थर्माकॉलपासून बनविलेली कोणतीही वस्तू किंवा घटक.

३. महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम २(एच) व कलम ४ चे उपकलम १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत संपूर्ण राज्यात खालील बाबींचे नियमन करण्यात येत आहे.

(१) १) प्लास्टीक पासून बनविल्या जाणाऱ्या पिशव्या(हँडल असलेल्या व नसलेल्या) तसेच थर्माकॉल (पॉलिस्टायरिन) व प्लास्टीक पासून बनविण्यात येणाऱ्या व एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजेबल वस्तु, उदा. ताट, कप्स, प्लेटस, ग्लास, काटे, वाटी, चमचे, भांडे, हॉटेलमध्ये अन्नपदार्थ पॅकेजींगसाठी वापरले जाणारे भांडे व वाटी, स्ट्रॉ, नॉन वोवन पॉलिप्रॉपीलेन बॅग्स (Non-Woven Polypropylene bags), द्रव पदार्थ साठविण्यासाठी वापरात येणारे प्लास्टीक पाऊच/ कप, सर्व प्रकारचे अन्नपदार्थ, धान्य इत्यादी साठविण्यासाठी व पॅकेजींगसाठी वापरले जाणारे प्लास्टीक व प्लास्टीक वेष्टन, इत्यादींचे उत्पादन, वापर, साठवणूक, वितरण, घाऊक व किरकोळ विक्री, आयात व वाहतूक करण्यास राज्यात संपूर्णत: बंदी आहे.

२) ही अधिसूचना राज्यातील कोणतीही व्यक्ती, व्यक्तींचा समूह, शासकिय व अशासकिय संस्था, शैक्षणिक संस्था, क्रिडा संकुल, क्लब्स, चित्रपट व नाटयगृहे, औद्योगिक घटक, समारंभाचे हॉल, वाणिज्यिक संस्था, कार्यालये, धार्मीक स्थळे, धार्मीक संस्था, हॉटेल, ढाबे, दुकानदार, मॉल्स, विक्रेता, कॅटरर्स, घाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता, व्यापारी, फेरीवाला, वितरक, वाहतूकदार, सेल्समन, मंडई, उत्पादक, स्टॉल्स, पर्यटन क्षेत्रे, वने व संरक्षित वने, इको सेन्सीटीव्ह क्षेत्रे, सर्व सागरी किनारे, सर्व सार्वजनिक ठिकाणे, बस स्थानके, रेल्वे स्थानके इ. ठिकाणी लागू राहील.

३)संपूर्ण राज्यात प्लास्टिक व थर्माकॉलचा वापर सजावटीमध्ये करण्यास बंदी असेल.

(२) तथापी राज्यात खाद्यपदार्थ साठविण्या योग्य उच्च दर्जा प्राप्त बिसफेनॉल-अ विरहीत पीईटी व पीईटीई पासून बनविलेल्या ०.५ लीटर पेक्षा कमी द्रव धारण क्षमता नसलेली व ज्यावर पुर्नचक्रणासाठी पूर्वनिर्धारित पुर्नखरेदी ठळकपणे छापलेली असेल अशा बाटल्यांचा वापर, खरेदी, विक्री व साठवणूक खालील अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल.

उत्पादक, विक्रेते व वितरक यांनी पर्यावरणासंबंधी विस्तारीत जबाबदारी म्हणून अशा पुर्ननिर्धारीत पुर्नखरेदी किंमत निश्चित केलेल्या पीईटी व पीईटीई बाटल्यांच्या पुर्नचक्रणासाठी पुर्नखरेदीसाठी ठेव व्यवस्था (बाय बॅक डिपॉझीटरी सिस्टम) निर्माण करुन पुरेशी क्षमता असलेले संकलन व पुर्नचक्रण केंद्रे हे नियम प्रकाशित होण्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत मोक्याच्या ठिकाणी कार्यान्वीत करणे बंधनकारक असेल. तसेच अशी वापरलेली बाटली दुकानदार, विक्रेते यांना पुर्नखरेदी करणे बंधनकारक असेल.

१ लीटर व त्यापेक्षा जास्त आणि ०.५ लीटर पीईटी / पीईटीई बाटल्यांवर पुर्नखरेदी किंमत रु.१/- आणि रु.२/- अशी अनुक्रमे ठळकपणे छापलेली असावी. राज्यात ०.५ लीटर व त्यापेक्षा कमी द्रव धारणा क्षमता असलेल्या पीईटी व पीईटीई बाटल्यांचा वापर, खरेदी, विक्री, वितरण व साठवणूकीवर संपूर्ण बंदी असेल.

(३) यामध्ये खालील बाबी वगळण्यात आलेल्या आहेत :-

(१) औषधांच्या वेष्टनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक.

(२) वन व फलोत्पादनासाठी, कृषी, घनकचरा हाताळणे इ. प्रयोजनांसाठी लागणाऱ्या रोपावाटीकांमध्ये वापरण्यात येणारी फक्त कंपोस्टेबल प्लास्टीक पिशवी वा प्लास्टीक. तथापि, अशा प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टकि पिशवी/ शिटवर ठळकपणे तसे निर्देशित वापरासाठी फक्त असे स्पष्ट लिहिलेले असावे. तथापि, अशा कंपोस्टेबल बॅग्सच्या विक्री किंवा विक्रीपूर्वी उत्पादकाने किंवा विक्रेत्याने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण

मंडळाकडून अशा बॅग्स कंपोस्टेबल असल्याबाबत प्रमाणित करुन घेणे बंधनकारक असेल.

(३) विशेष आर्थिक क्षेत्र, निर्यातीसाठी विविक्षीत उद्योग इ. मध्ये फक्त निर्यातीसाठी प्लास्टीक व प्लास्टीक पिशवीची उत्पादने.

(४)उत्पादनाच्या ठिकाणी उत्पादनाच्या प्रक्रियेदरम्यान अनिवार्य वेष्टनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक आवरण वा पिशवी. परंतू अशा प्लास्टीकच्या पुर्नवापर व पुर्नचक्रणाबाबत स्पष्टपणे मार्गदर्शक सूचना अशा वस्तूंवर मुद्रीत केलेले असावे.

(५) दूधाच्या पॅकेजींगसाठी अन्न साठवणूकीचा दर्जा असलेल्या परंतू ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाड नसलेल्या प्लास्टीक पिशव्या. तथापि, पुर्नखरेदी पध्दती विकसित करण्यासाठी अशा पिशव्यांवर पुर्नचक्रणासाठी पूर्वनिर्धारित किंमत जी रु. ०.५० पेक्षा कमी नसेल ती ठळकपणे छापलेली असावी. पुर्नचक्रणासाठी अशा पिशव्यांची संकलन व्यवस्था विकसित करण्यासाठी दूध डेअरी, वितरक व विक्रेते यांनी अशा पुर्नचक्रणासाठी निर्धारित छापील पुर्नखरेदी किंमतीनुसार अशा पिशव्या पुर्नखरेदी करणे बंधनकारक असेल. तसेच दूध डेअरी व दूध वितरकांनी दुधाच्या पिशव्यांऐवजी काचेच्या बाटलीचा किंवा पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याची व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

४. या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी व नियमांतर्गत कारवाई करणेसाठी महाराष्ट्र अविघटनशिल कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम १२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत कारवाई करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात प्राधिकृत करण्यात येत आहे.

१) १. महानगरपालिका आयुक्त, उपायुक्त, शॉप्स अँड एस्टॅबलीशमेंट अधिकारी व निरिक्षक, अनुज्ञाप्ती निरिक्षक, स्वच्छता निरक्षिक, आरोग्य निरिक्षक, आरोग्य अधिकारी, प्रभाग

अधिकारी किंवा आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी तसेच सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी व त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी या नियामांतील सर्व तरतूदींची अंमलबजावणी त्यांच्या क्षेत्रात करतील.

२. जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसिलदार, तलाठी व जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेले इतर अधिकारी हे त्यांच्या क्षेत्रात या नियामांतील सर्व तरतूदींची अंमलबजावणी करतील.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी व ग्राम सेवक हे त्यांच्या क्षेत्रात या नियामांतील सर्व तरतूदींची अंमलबजावणी करतील.

४. सदस्य सचिव, प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी व क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शास्त्रज्ञ श्रेणी-२, शास्त्रज्ञ श्रेणी-१ व संचालक, पर्यावरण.

५. संचालक, आरोग्य सेवा, उप संचालक, आरोग्य अधिकारी.

६. संचालक, प्राथमिक व उच्च शिक्षण.

७. सर्व टूरिझम पोलिस, पोलिस निरिक्षक, पोलिस उप निरिक्षक, मोटर वाहन निरिक्षक, वाहतूक पोलिस, सह व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी.

८. उपायुक्त, पूरवठा, जिल्हा पूरवठा अधिकारी,

९. आयुक्त (राज्यकर) व सर्व राज्यकर अधिकारी .

१०. फॉरेस्ट रेन्ज ऑफिसर, उपवन सरंक्षक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी.

२) १. या अधिसूचनेच्या अंमलबाजणीमध्ये गाव पातळीवर किंवा शहरी भागात सहभागी होण्यासाठी इच्छूक व्यक्तींनी, व्यक्तींच्या समूहांनी, सेवाभावी संस्था, औद्योगीक घटकांची संघटना, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य इत्यांदींनी या नियमांतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्याकडे नोंदणी करावी.

२. अशी नोंद केलेल्या व्यक्ती, व्यक्तीसमूह, सेवाभावी संस्था, औद्योगीक घटकांची संघटना, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य इ. या नियमांतर्गत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना नियमांच्या अंमलबजावणीत मदत करतील वा नियमांचे उल्लंघन करण्याऱ्यांबाबत माहिती देतील किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांना दंड आकारणे, प्लास्टीक वा थर्माकॉलपासून बनविलेला माल जप्त करणे, गुन्हा नोंदविण्यास मदत करणे इ. कार्य पार पाडण्यासाठी सहाय्य करतील.

५. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योग उभारणी संमतीपत्र, उत्पादन सुरु करण्याचे संमतीपत्र व नुतनीकरण देतांना प्लास्टीक उत्पादकांनी अनुज्ञेय वस्तूंवर पुर्नचक्रण किंमत व पुर्नखरेदी किंमत स्पष्टपणे छापलेली असावी, अशी अट घालावी व या अटींचे उल्लंघन करणाऱ्या उद्योग घटकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

६. पीईटी / पीईटीई बाटल्या व दूधाच्या पिशव्यांवर उत्पादन स्तरावर पुर्नचक्रण शुल्क व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर आकारावयाचे पुर्नचक्रण शुल्क याबाबत वस्तू व सेवा कर संचालनालय यांचेशी सल्लामसलत करुन, शक्तीप्रदत्त समितीच्या मान्यतेने स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

७. या नियमनाच्या अंमलबजावणीसाठी कालावधी खालीलप्रमाणे असेल :-

| **अ.क्र.** | **संबंधित घटक** | **अंमलबजावणीचा कालावधी** | |
|---|---|---|---|
| | | **कृती** | **कालावधी** |
| १. | उत्पादक | बंदीत वस्तूंचे उत्पादन व विक्री | अधिसूचनेच्या दिनांकापासून |
| | | उपलब्ध साठयाची विल्हेवाट<br>१) राज्यातील क्षेत्राबाहेर विक्री<br>२) प्राधिकृत पुर्नचक्रण करणाऱ्या घटकांस | अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | किंवा उद्योगास विक्री. | |
| २. | विक्रेते, किरकोळ विक्रेते, व्यापारी, वितरक | विक्री वर बंदी | अधिसूचनेच्या दिनांकापासून |
| | | उपलब्ध साठयाची विल्हेवाट<br>१) राज्यातील क्षेत्राबाहेर विक्री<br>२) प्राधिकृत पुर्नचक्रण करणाऱ्या घटकांस किंवा उद्योगास विक्री.<br>३) स्थानिक स्वराज्य संस्थेकडे शास्त्रीय विल्हेवाटीसाठी किंवा पुर्नचक्रणानासाठी हस्तांतरण करणे.<br>आणि पुर्नखरेदी प्रक्रियेत जमा होणारे प्लास्टीक कचरा व पेट बाटल्या या प्राधिकृत पुर्नचक्रण करणाऱ्या घटकांस व उद्योगांस तयार केलेल्या संकलन पध्दतीनुसार देणे. | अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत. |
| ३. | वापरकर्ते | बंदीत वस्तूंचा वापर. | अधिसूचनेच्या दिनांकापासून |
| | | वैयक्तिक व्यक्तींकडे सध्या उपलब्ध असलेल्या प्रतिबंधीत प्लास्टीक वस्तूंच्या विल्हेवाटीसाठी:<br>१) प्राधिकृत पुर्नचक्रण करणाऱ्या घटकांस किंवा उद्योगास विक्री.<br>२) स्थानिक स्वराज्य संस्थेकडे शास्त्रीय विल्हेवाटीसाठी किंवा पुर्नचक्रणानासाठी हस्तांतरण करणे. | अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत. |
| ४. | स्थानिक स्वराज्य संस्था | अस्तीत्वातील बंदीत प्लास्टीक वस्तूंच्या घटकांच्या साठयाचे किंवा त्यापासून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन, वाहतूक व्यवस्था करुन ती प्राधिकृत पुर्नचक्रण करणाऱ्या घटकांस किंवा शास्त्रीय विल्हेवाटीसाठी व्यवस्था निर्माण करणे. | अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत. |

८.　भविष्यात या नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यादींसाठी मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली गठीत शक्तीप्रदत्त समिती यथोचित निर्णय घेईल. यामध्ये पेट बॉटल्स व इतर अविघटनशील कचऱ्यावर नियमनाबाबत देखील ही समिती निर्णय घेऊ शकते.

९. तसेच अद्ययावत तंत्रज्ञानाच्या अधारे अविघटनशील कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत शासनास तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्यात यावी. ही समिती शक्तीप्रदत्त समितीला वेळोवेळी यासंबंधित शिफारसी करेल.

१०. अंमलबजावणी प्राधिकरणे, त्यांना लागू असेल त्यानुसार, नमूना "अ" मध्ये राज्य शासनाला त्यांचा त्रैमासिक अहवाल सादर करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने.

(सतिश गवई)
अपर मुख्य सचिव (पर्यावरण)

## नमूना "अ"

**१) अहवालाचा कालावधी : पासून पर्यंत**

**२) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेचे नांव व पत्ता :**

**३) अधिनियमा अंतर्गत प्रकाशित झालेल्या नियमांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव:**

**४) दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन) :**

**५) ई-मेल आयडी :**

**६) कार्यक्षेत्रात नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे दाखल झालेल्या प्रकरणांची संख्या :**

| कार्यक्षेत्र | आपसात मिटविण्यात आलेली प्रकरणे | | तिसरा गुन्हा | न्यायालयात दाखल प्रकरणांची संख्या | न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या | वसूल केलेल्या दंडाची रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पहिला गुन्हा | दुसरा गुन्हा | | | | | |

**१. ________________________________________**

**विभागाची एकूण**

**२. ________________________________________**

**विभागाची एकूण**

**एकूण निव्वळ __________________________________**

**७) नियमांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी हाती घेतलेल्या विशेष मोहिमेची सविस्तर माहिती:**

**८) पहिला गुन्हा आणि दुसरा गुन्हा करणाऱ्यांची यादी :**

**९) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची त्यांच्या कार्यक्षेत्रात जनजागृतीसाठी हाती घेतलेल्या कार्यकमांची सविस्तर माहिती :**

**१०) तत्संबंधीची माहिती :**

**(प्रतिवेदन प्राधिकरणाची स्वाक्षरी)**

ENVIRONMENT DEPARTMENT
15th Floor, New Administrative Building
Madam Cama Road, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 23rd March, 2018

NOTIFICATION

No.Plastic-2018/C.R. No.24/TC-4.

WHEREAS, concerns about usage and disposal of plastic are diverse and include accumulation of waste in landfills, water bodies and in natural habitats, physical problems for wild animals resulting from ingestion or entanglement in plastic, the leaching of chemicals from plastic products and the potential for plastics to transfer chemicals to wildlife and humans are increasing.

AND WHEREAS, because of non-biodegradable plastic waste handling of municipal solid waste becomes difficult and incurs more financial burden and also due to burning such waste in open environment causes various diseases in humans and animals.

AND WHEREAS, it is observed that non-biodegradable garbage is responsible for clogging drains and nallas causing flood in urban settlement leading to loss of lives and damage to properties and infrastructure.

AND WHEREAS, plastic waste and micro plastic cause danger to marine and freshwater bio-diversity and also hamper ecosystem services due to spreading of such waste in and around ecosystems, on tourists places, beaches and on agriculture and forest areas.

AND WHEREAS, non-biodegradable plastic waste and micro plastic are having negative impacts on fish diversity and fisheries activity.

AND WHEREAS, non-biodegradable waste is posing problems in effective implementation of Clean India Mission.

AND WHEREAS, detailed stake-holders consultations and deliberations with the field level officials were undertaken, and public notices were also published in leading newspapers.

AND WHEREAS, despite the ban on plastic bags of less than 50 micron through Maharashtra Plastic Carry Bags (Manufacture and Usage) Rules, 2006, there is increase in the non-biodegradable plastic garbage waste causing damage to environment and health.

Therefore, in exercise of the powers conferred by Clause (1) & (2) of Section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, the Government of Maharashtra hereby authorises regulations for manufacture, usage, sale, storage, transport of the products made from plastic & thermocol etc. which generates non-biodegradable waste.

1. Short Title and Commencement :-

   1. This may be called the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018.

   2. This Notification shall come into force with effect from the date of their publication in the Maharashtra Government Gazette.

2. Definitions:

1) “Act” means the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006.

2) “Plastic” means material; which contains as an essential ingredient a high polymer such as polyethylene terephthalate, high density polyethylene, vinyl, low density polyethylene, polypropylene, polystyrene resins, poly styrene (thermacol), non-oven polypropylene, multi layered co extruder, poly propylene, poly terephthalate, poly amides, poly methyl methacrylate, plastic micro beads, etc.

3) “Compostable Plastic” means plastic that undergoes degradation by biological processes during composting to yield $CO_2$, water, inorganic compounds and biomass at a rate consistent with other known compostable materials, excluding environmental petro-based plastic, and does not leave visible, distinguishable or toxic residue, and which shall confirm to the Indian Standard: IS 17088:2008 titled as Specifications for Compostable Plastics, as amended from time to time.

4) “Plastic sheets” means sheet made of plastic.

5) “Plastic Waste” means any plastic discarded after use or after their intended use is over.

6) “Recycling” means the process of transforming segregated plastic waste into a new product or raw material for producing a new products.

7) "Producer / Manufacturer" means person engaged in manufacture or import of plastic bags or multilayered packaging or containers or plastic sheets or like, and includes industries or individuals using plastic sheets or like or covers made up of plastic sheets or sheets or also manufacture products made from plastic or used plastic for packaging or wrapping the commodity.

8) "Commodity" means tangible items that may be brought or sold and includes all marketable goods or wares.

9) "Plastic bags" means bags made from plastic material, used for the purpose of carrying or dispensing commodities which have handle or without handle and also includes bags made from non-woven polypropylene and constitute or form an integral part of the packaging at manufacturing stage or is an integral part of manufacturing.

10) "PET and PETE bottles" means bottles made up of polyethylene terephthalate (PET) and polyethylene terephthalate esters (PETE) used for packaging or storing liquid or semi liquid food, including water.

11) "Commodities made from Thermocol" means any commodity or product made from Thermocol.

12) "Form" means form attached with these regulations.

13) "Product" means anything or object or item made from plastic or Thermocol.

3. Following activities will be regulated in the whole State of Maharashtra in exercise of the powers conferred by section 2(h) , sub-section 1 and 2 of section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006.

(1) 1) The ban in the whole State of Maharashtra for manufacture, usage, transport, distribution, wholesale & retail sale and storage, import of the plastic bags with handle and without handle, and the disposable products manufactured from plastic & thermocol (polystyrene) such as single use disposable dish, cups, plates, glasses, fork, bowl, container, disposable dish/ bowl used for packaging food in hotels, spoon, straw, non-woven polypropylene bags, cups/ pouches to store liquid, packaging with plastic to wrap or store the products, packaging of food items and food grain material etc.

2) These regulations are applicable to every person, body of person, government and non-government organization, educational institution, sport complex, clubs, cinema halls and theaters, marriage/celebration halls, industrial units, commercial institutions, offices, pilgrimage organisers, pilgrimages and religious places, hotels, dhabas, shopkeepers, malls, vendors or sellers, traders, manufacturers, caterer, wholesalers, retailers, stockiest, businessmen, hawkers, salesmen, transporters, market, producers, stalls, tourist places, forest & reserved forest, eco-sensitive areas, all sea beaches, all public places, bus stands, railway stations in the State of Maharashtra.

3) There will be ban in whole state for use of plastic and thermocol for decoration purpose.

(2) Use, sale, storage and manufacture of PET or PETE bottles made up of high quality food grade virgin Bisphenol-A free material having liquid holding capacity not less than 0.5 liters and printed on it with predefined buy back price shall be allowed subject to compliance of the following.

PET or PETE bottle manufacturers, producers, sellers and traders under 'Extended Producers and Sellers/Traders Responsibility' will develop "Buy Back Depository Mechanism" with a predefined buy back price printed specifically on such PET or PETE bottles and also set up Collection and Recycling units of adequate capacity and number to collect and recycle such PET or PETE bottles within three months from the date of publication of this notification. Traders / sellers will buy back such used PET/ PETE bottles with predefined buy back price printed on such bottles.

PET / PETE bottles having liquid holding capacity 1 liter or more and of 0.5 liter will be printed on the body of the bottle with predefined buy back price of Rs. 1/- and Rs.2/- respectively. However, there will be ban on usage, purchase, sale, distribution and storage of PET / PETE bottles having liquid holding capacity less than 0.5 liters in the State.

(3) These regulations shall not be applicable to the following items:-

i. Plastic bags or plastic used for packaging of medicines;

ii. Only compostable plastic bags or material used for plant nurseries, horticulture, agriculture, handling of solid waste. However, bags / sheets utilized for this purpose shall be prominently printed on it with "Use exclusively for this specific purpose only". The manufacturers or seller of compostable plastic carry bags shall obtain a certificate from the Central Pollution Control Board before marketing or selling for this purpose.

iii. To manufacture plastic and plastic bags for export purpose only, in the Special Economic Zone and export oriented units etc.

iv. The plastic cover / plastic to wrap the material at the manufacturing stage or is an integral part of manufacturing. Guidelines to recycle or reuse such plastic should be printed prominently on the cover and material.

v. Food grade virgin plastic bags not less than 50 micron thickness used for packaging of milk. However, on such plastic bags used for this purpose, should be clearly printed with the price for buy back which should not be less than Rs.0.50 to develop buy back system for recycling. To develop collection mechanism and ensure proper recycling of such used bags, milk dairies, retail sellers and traders will buy back such used milk bags with predefined buy back price printed on it. Milk dairies, retail sellers and traders will ensure that such buy back mechanism and collection and recycling system shall establish within three months from the date of publication of this regulation. However, Milk Dairy and distributors shall make efforts to develop alternative system with glass bottles or any other environmental friendly material for distribution of milk.

4. The following officers are authorized and empowered for the implementation and to take necessary legal action under powers conferred u/s 12 of the provisions of the Maharashtra Non-biodegradable (Control) Act, 2006, as per their jurisdiction :-

1. 1) Municipal Commissioners, Deputy Municipal Commissioners, Shops & Establishment Officers and Inspectors, Sanitary Inspector, Health Inspector, Health Officer, Ward Officers or any other Officer nominated by the Municipal Commissioner as well as Chief Officers of all Municipal Councils and any other Officer nominated by the Chief Officer are

authorized to implement the provisions of the said Regulations in their respective jurisdiction.

2) District Collector, Deputy Collector, Sub-Divisional Officer, Tahasildar, Talathi and any other officer nominated by Collector, are authorized to implement the provisions of the said Regulations in their respective jurisdiction.

3) Chief Executive Officer, Zilla Parishad; Block Development Officer, Health Officer, Development Officer, District Education Officer, Block Education Officer and Gram Sevak are authorized to implement the provisions of the said Regulations in their respective jurisdiction.

4) Member Secretary, Regional Officer, Sub-Regional Officer and Field Officer of Maharashtra Pollution Control Board, Scientist-I & II and Director, Environment Department, Government of Maharashtra.

5) Director, Health Services; Deputy Director, Health Services; Health Officers.

6) Director, Primary & Secondary Education Board.

7) All Tourism Police, Police Inspector, Police Sub-Inspector, Motor Vehicle Inspector, Traffic Police, Joint Managing Director, Maharashtra Tourism Development Corporation or any other officer authorized by Managing Director, Maharashtra Tourism Development Corporation.

8) Deputy Commissioner (Supply), District Supply Officer

9) Commissioner State Tax and all State Tax Officers.

10) Range Forest Officer or any other officer authorized by Deputy Conservator of Forest.

2. 1) For implementation of these regulations, the person at village or city level, interested persons, group of people, welfare organizations, industrial association and members of all local bodies etc. shall register any offence with the concerned authorized officer, notified in these regulations for this purpose.

2) The said registered person, group of people, welfare organizations, industrial association shall help the officers authorized under the said regulations, for providing information of violation of these regulations and assist such officers to impose fine, to confiscate the material made from plastic & thermocol and assist in registering the offence.

5. Maharashtra Pollution Control Board shall impose the condition on manufacturers indicating that recycling price and buy back price should be prominently printed on PET / PETE bottles and plastic bags permissible under these regulations while issuing consent to establish, consent to operate/ renewal and also to initiate actions on non-complying units or industries under appropriate act.

6. Separate order for levying recycling fees from manufacturers at manufacturing stage and recycling fees at selling point at local body level will be issued in consultation with Directorate of Goods and Services Taxes and with approval of the Empowered committee .

7. Time frame for implementation of these regulation :-

| **Sr. No.** | **Stake Holder** | **Implementation Period** | |
|---|---|---|---|
| | | **Activity** | **Time Frame** |
| 1. | Manufacturer / Producer | Manufacturing and sale of banned items. | From date of notification. |
| | | Disposal of existing stock of banned items by<br>1) Sale outside the State.<br>2) Sale to authorized recycler or industry. | One month from the date of notification. |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | Sellers, Retailers, Traders | Ban on Sale | From the date of Notification |
| | | Disposal of Existing Stock by<br>1) Sale outside the State.<br>2) Sale to authorized recycler or industry.<br>3) Handed over to Local Body for Scientific disposal or recycling;<br>and plastic waste generated under buy back scheme to be handed over to authorized recyclers or to the such mechanism developed for the same. | One month from the date of notification. |
| 3. | Users | Use of banned items. | From the date of Notification. |
| | | Disposal of existing plastic banned items with the individual users by<br>1) Handed over to Local Body for Scientific disposal or recycling;<br>2) Sale to authorized recycler or industry. | One month from the date of Notification. |
| 4. | Local Body | To arrange the collection, transportation of banned plastic items or plastic waste of existing stock for recycling to authorized recyclers or industries or scientific disposal. | One month from the date of Notification. |

8. Empowered Committee, constituted under the chairmanship of Minister (Environment) shall monitor the implementation of these regulations and will regularly review the incorporation of additional items which generate non-biodegradable garbage including use of PET or PETE bottles to be banned in the State. This committee will also help in resolving any difficulty faced by implementing authorities during implementation and if required also carry out any amendment in these regulations with an aim to reduce the volume of non-biodegradable garbage generation in the State

9. Expert Committee shall be constituted under these regulations which will suggest the recommendations including amendment required, if any in the regulations to the Empowered Committee for effective implementation of the regulations and solutions to reduce the non-biodegradable garbage.

10. Implementing Authorities, shall submit quarterly report in the Form-A to the State Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH GAVAI,
Additional Chief Secretary (Environment)

**FORM-A**

(1) Period of Report : From _____________to__________

(2) Name & Address of Enforcing Agency :

(3) Name of the Officers Incharge of enforcement of the aforesaid Rules:

(4) Telephone/Cell No.(Office) :-

(5) E-Mail ID :

(6) No. of cases registered in the jurisdiction for violation:

| Jurisdiction | Compounding | | 3rd Offence | No. of Cases filed in the Court | No.of cases sub-judiced | Amount of fine collected | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1st Offence | 2nd Offence | | | | | 0 |

1. _____________________________________________________________

Sub-Total

2. _____________________________________________________________

Sub-Total

Grand Total --------------------------------------------------------------------------------

(7) Details of special drives undertaken for effective implementation of the Rules :-

(8) List of first time offenders and second time offenders.

(9) Details of public awareness programmes conducted by Enforcing Agency in their jurisdiction.

(10) Any other relevant information.

(Signature of the Reporting Authority)

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ४६(२)] बुधवार, एप्रिल ११, २०१८/चैत्र २१, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १०५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### पर्यावरण विभाग

१५वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ११ एप्रिल २०१८.

### अधिसूचना

क्रमांक प्लास्टीक-२०१८/प्र.क्र. २४/तां. क. ४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाद्वारे प्लास्टीक व थर्माकॉल इत्यादींपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियमन करण्याकरिता, दिनांक २३ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन , वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ प्रसिध्द करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेच्या परिच्छेद ८ नुसार भविष्यात या नियमनांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यादींसाठी व इतर अविघटनशील कचऱ्यावर नियमनाबाबत निर्णय घेण्यासाठी दिनांक २२ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये शक्तीप्रदत्त समिती गठीत करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, प्लास्टीक उत्पादक संघटनांबरोबर झालेल्या चर्चेच्या व त्यांनी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शक्तीप्रदत्त समितीच्या दिनांक २८ मार्च २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ या अधिसूचनेमध्ये काही सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली होती ;

त्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१. परिच्छेद ३ (२) पुढीलप्रमाणे वाचावा :—

"राज्यात खाद्यपदार्थ साठविण्यायोग्य उच्च दर्जा प्राप्त बिसफेनॉल-अ विरहित पीईटी व पीईटीई पासून बनविलेल्या व ज्यावर पुनर्चक्रणासाठी पुर्वनिर्धारित पुनर्खरेदी किंमत ठळकपणे छापलेली असेल अशा बाटल्यांचा वापर, उत्पादन, खरेदी, विक्री व साठवणूक खालील अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल :–

(अ) उत्पादक, वितरक व विक्रेते यांनी पर्यावरणासंबंधी विस्तारित जबाबदारी म्हणून अशा पुर्वनिर्धारित पुनर्खरेदी किंमत निश्चित केलेल्या पीईटी व पीईटीई बाटल्यांच्या पुनर्चक्रणासाठी पुनर्खरेदी ठेव व्यवस्था (बाय बॅक डिपॉझीटरी सिस्टम)

निर्माण करून पुरेशी क्षमता असलेले संकलन केंद्र, रिव्हर्स व्हेंडींग मशीन, क्रशींग मशीन व पुनर्चक्रण केंद्राबरोबर सांगड घालून साखळी निर्माण करणे इत्यादी हे नियमन प्रकाशित होण्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत मोक्याच्या ठिकाणी, जसे मॉल्स, मल्टीप्लेक्सेस, हॉटेल्स, दुकाने, पर्यटन स्थळे, सागरी चौपाट्या, किल्ले, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी कार्यान्वित करणे बंधनकारक असेल.

(ब) अशा वापरलेल्या बाटलीची दुकानदार, विक्रेते यांना छापलेल्या पुनर्खरेदी किमतीनुसार पुनर्खरेदी करणे बंधनकारक असेल.

(क) १ लीटर व त्यापेक्षा जास्त आणि १ लीटर पेक्षा कमी द्रवधारणा क्षमता असलेल्या पीईटी/पीईटीई बाटल्यांवर पुनर्खरेदी किंमत अनुक्रमे रुपये १ आणि रुपये २ अशी ठळकपणे छापलेली असावी."

२. परिच्छेद ७ मधील अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये "अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत" ऐवजी "अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. बी. एन. पाटील,**
संचालक (पर्यावरण).

## ENVIRONMENT DEPARTMENT

15th floor, New Administrative Building, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032
dated the 11th April 2018.

*NOTIFICATION*

No. Plastic-2018/C.R.No. 24/TC-4.—WHEREAS, under the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, for regulating manufacture, usage, sale, storage, transport of the products made from plastic and thermocol etc., the Government of Maharashtra on 23rd March 2018 published the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018 ;

AND WHEREAS, as per the para 8 of the said notification, for implementation of these regulations and help in resolving any difficulty faced by implementing authorities during implementation and if required also carry out any amendment in these regulations, the Government *vide* Government Resolution dated 22nd March 2018 constituted the Empowered Committee ;

AND WHEREAS, in consultation with plastic manufacturers associations and considering their representations, it was resolved in the meeting of Empowered Committee on 28th March 2018 to make amendments in the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018 ;

NOW THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) and (2) of Section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, the Government of Maharashtra hereby makes following amendments in Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018 :—

1. Para 3 (2) shall be read as follows :—

"Use, purchase, sale, storage and manufacture of PET and PETE bottles made up of high quality food grade virgin Bisphenol-A free material and printed on it with predefined buy back price shall be allowed subject to compliance of the following :—

(a) PET or PETE bottle manufacturers, producers, sellers and traders under 'Extended Producers and Sellers/Traders Responsibility' will develop "Buy Back Depository Mechanism" with a predefined buy back price printed specially on such PET or PETE bottles and also set up collection centers, reverse vending machines, crushing machines with linkages established with recycling units, to collect and recycle such PET or PETE bottle, within three months from the date of publication of this notification, at strategic places including malls, multiplexes, hotels, shops, tourist places, beaches, forts, public places etc.

(b) Traders / sellers will buy back such used PET/PETE bottles with predefined buy back price.

(c) PET / PETE bottles having liquid holding capacity of 1 liter or more and of less than 1 liter will have printed on the body of the bottle, the buyback price of Rs. 1 and Rs. 2 respectively.

2. In Para 7 pertaining to time frame for implementation, the word, namely "one month from the date of Notification" shall be read as " three months from the date of Notification".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. B. N. PATIL,
Director (Environment).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ८६(४)] सोमवार, जुलै २, २०१८/आषाढ ११, शके १९४० [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

## असाधारण क्रमांक २२७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**पर्यावरण विभाग**

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१८

**अधिसूचना**

क्रमांक प्लास्टीक. २०१८/प्र.क्र.२४/ता.क.-४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाद्वारे प्लास्टीक व थर्माकॉल इत्यादींपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियमन करण्याकरिता दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच दिनांक ११ एप्रिल, २०१८ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा प्रसिद्ध करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेच्या परिच्छेद ८ नुसार भविष्यात या नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन, अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यांदीसाठी व इतर अविघटनशील कचऱ्यावर नियमनाबाबत निर्णय घेण्यासाठी दिनांक २२ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयाद्वारे शक्तीप्रदत्त समिती गठीत करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, शक्तीप्रदत्त समितीच्या दिनांक ३० जून, २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ मध्ये काही सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोट कलमे (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

**१. दिनांक २३ मार्च २०१८ च्या अधिसूचनेमध्ये परिच्छेद (२) मध्ये अनुक्रमांक १४ व १५ समाविष्ट करण्यात येत आहे.**

(१४) " मल्टीलेअर(बहूस्तरीय पॅकेजींग) " म्हणजे पॅकेजींग मटेरियल की ज्यामध्ये, कमीतकमी एक स्तर प्लास्टीकचा असतो तसेच त्यामध्ये एक किंवा अधिक स्तर कागद/ धातू/ बोर्ड/ ॲल्यूमिनियम फॉईल लॅमिनेटेड स्वरुपात किंवा कोएक्सट्रुडेड स्वरुपात असतो.

(१५) " प्लास्टीकचा एक स्तर असलेला पुठ्ठा किंवा पेपर-आधारित खोका " म्हणजे द्रव/घन अन्न व पेय पदार्थ (उदा. दुग्धजन्य, रस इत्यादी) सुरक्षित व आरोग्यदायी वापरासाठी वापरण्यात येणारा खोका की ज्यामध्ये पेपरबोर्ड हा प्राथमिक घटक असतो व एक किंवा जास्त स्तर प्लास्टीक, फॉईल इत्यादींचा असतो.

**२. दिनांक ११ एप्रिल, २०१८ च्या अधिसूचनेतील परिच्छेद १ च्या अनुक्रमांक (क) मध्ये बदल करण्यात येत आहे व (ड), (इ) व (फ) चा अंर्तभाव करण्यात येत आहे :—**

(क) एक लिटर व त्यापेक्षा जास्त द्रव धारण क्षमता असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या पीईटी व पीईटीई बाटल्यांवर ठेव व परतावा यांची किंमत रु.१/- अथवा उत्पादकाने ठरविलेली पुनर्खरेदी किंमत छापणे बंधनकारक राहील. तसेच एक लिटर पेक्षा कमी व २०० मिलीलिटर पेक्षा जास्त द्रव धारण क्षमता असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या पीईटी व पीईटीई बाटल्यांवर ठेव व परतावा यांची किंमत रु.२/- अथवा उत्पादकाने ठरविलेली पुनर्खरेदी किंमत छापणे बंधनकारक राहील.

(ड) २०० मि.लि.पेक्षा कमी द्रव धारण क्षमता असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या पीईटी व पीईटीई बाटल्यांचे उत्पादन, खरेदी, विक्री, वितरण, साठवणूक व वापरावर संपूर्ण राज्यामध्ये बंदी असेल.

(इ) पेट बॉटलचे मोठ्या प्रमाणात वापर करणारे ग्राहक उदा. हॉटेल्स/मंगल कार्यालये/कार्यालये/संस्था/मॉल्स यांनी प्लास्टीक कचरा गोळा करण्याकरिता स्वतंत्र जागा ठेवून त्याची उत्पादकांच्या माध्यमातून पुनर्चक्रीकरणाद्वारे विल्हेवाट लावणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

(फ) ठेव व परतावा किंमत/पुनर्खरेदी किंमतीद्वारे किरकोळ विक्रेत्यांकडून पेट बॉटल गोळा करण्याची व पुनर्चक्रीत करण्याची जबाबदारी सर्वस्वी पेट बॉटल उद्योगांची राहील.

**३. दिनांक २३ मार्च २०१८ च्या अधिसूचनेतील परिच्छेद ३ मध्ये अनुक्रमांक २ नंतर २(अ) खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे :—**

(१) केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल, भारत सरकार यांनी दिनांक १८ मार्च २०१६ रोजी अधिसूचित केलेल्या प्लास्टीक कचरा (व्यवस्थापन) अधिनियम, २०१६ अन्वये मल्टीलेअर पॅकेजिंग उत्पादकांनी, पुनर्चक्रण न होणाऱ्या मल्टीलेअर प्लास्टीक दोन वर्षांत बंद करणे बंधनकारक आहे. याबाबतचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे पुनर्चक्रण न होणारे मल्टीलेयर पॅकेजींग तात्काळ बंद करणे बंधनकारक राहील.

(२) पुनर्चक्रण होणारे मल्टीलेयर पॅकेजिंग व प्लास्टीकचा एक स्तर असलेला पुठ्ठा किंवा पेपर-आधारित खोका उत्पादकांनी/ब्रँड ओनर/उत्पादक संघटनेने, पर्यावरणासंबंधी उत्पादक दायीत्व योजने (EPR) अंतर्गत प्लास्टीकच्या विल्हेवाटीसाठी रॅग पिकर्स/स्क्रॅप टेड्रर्स, किरकोळ विक्रेता यांच्याशी समन्वय साधून प्लास्टीक कचऱ्याच्या पुनर्प्रक्रियेची केंद्र उत्पादक जबाबदारी संस्थेच्या (Producer Responsibility Organisation) माध्यमातून उभारणे किंवा संकलित केलेले प्लास्टीक अधिकृत पुनर्चक्रीत केंद्राद्वारे १००% विल्हेवाट बंधनकारक राहील.

(३) याबाबत मल्टीलेअर पॅकेजिंग व प्लास्टीकचा एक स्तर असलेला पुठ्ठा किंवा पेपर-आधारित खोका उत्पादकांनी केलेल्या व्यवस्थेचा आढावा सदर सुधारित अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तीन महिन्यांच्या कालावधीनंतर घेतला जाईल व आढाव्याअंती काढलेल्या निष्कर्षांवर मल्टीलेअर पॅकेजिंग उत्पादन व वापराबाबतच्या बंदीबाबत नियमन करण्याच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल.

**४. दिनांक २३ मार्च २०१८ च्या अधिसूचनेतील परिच्छेद ३ च्या अनुक्रमांक (३) मध्ये वगळण्यात आलेल्या बाबींव्यतिरिक्त खालील बाबी अंर्तभूत करण्यात येत आहेत :—**

(१) अनुक्रमांक १ मध्ये, औषधांच्या वेष्टनाबरोबर, वैद्यकीय उपकरणे आणि वैद्यकिय उत्पादनांसाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक यांचा समावेश करण्यात येत आहे.

(२) अनुक्रमांक २ मध्ये बदल नाही.

(३) अनुक्रमांक ३ मध्ये बदल नाही.

(४) अनुक्रमांक ४ मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :—

उत्पादनाच्या ठिकाणी, उत्पादनाच्या प्रक्रीयेदरम्यान अनिवार्य वेष्टनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक आवरण / थर्माकोल चा वापर करण्यास पुढील अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.—

(अ) पॅकेजिंगसाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे असणे बंधनकारक राहील.

(ब) पॅकेजिंगकरिता (अन्न पदार्थ पॅकींग व्यतिरिक्त) वापरण्यात येणारे प्लास्टीक हे कमीतकमी २० टक्के पुनर्चक्रीकरण असलेल्या प्लास्टीकपासून बनविणे बंधनकारक राहील.

(क) पॅकेजिंगकरिता (निर्यातिसाठी व्यतिरिक्त) वापरण्यात येणाऱ्या प्लास्टीकवर उत्पादकाचा तपशील, प्लास्टीकचा प्रकार (कोड क्रमांकासह), पुनर्खरेदी, मुद्रीत करणे बंधनकारक राहील.

(ड) पॅकेजिंगकरिता लागणारे प्लास्टीकचे उत्पादन करणारे उत्पादक / उत्पादक संघटनेने उत्पादक दायित्व योजनेअंतर्गत, कचरा वेचक / भंगारवाले, किरकोळ विक्रेता यांच्या सहभागाने, प्लास्टीक कचऱ्याच्या पुनर्प्रक्रीयेची केंद्रे उत्पादक जबाबदारी संस्थेच्या

(Producers Responsibility Organization) माध्यमातून उभारावी किंवा संकलित केलेल्या प्लास्टीकची अधिकृत पुनर्चक्रीत केंद्राद्वारे १०० टक्के विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

(५) अनुक्रमांक ५ मध्ये बदल नाही.

(६) अनुक्रमांक ६ मध्ये पुढील बाब अंतर्भूत करण्यात येत आहे :—

अन्न धान्य व किराणा माल किरकोळ व घाऊक विक्रेत्यांना अन्न धान्य व किराणा माल सीलबंद प्लास्टीक पॅकेजिंग/आवरणात विक्री करण्यास पुढील अटीं व शर्तीच्या अधिन राहून मुभा राहील.—

(अ) वापरण्यात येणारे प्लास्टीकचे आवरण ५० मायक्रॉनपेक्षा अधिक जाड व सदर प्लास्टीक आवरणाचे वजन कमीतकमी २ ग्रॅम पेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील व त्यावर प्लास्टीक मटेरियल उत्पादकाचे तपशील, प्लास्टीकचे प्रकार (कोड नंबरसहित), पुनर्खरेदी, मुद्रीत करणे बंधनकारक राहील.

(ब) पॅकेजिंग मटेरीअल उत्पादन करणारे उद्योग व अशा उत्पादक उद्योगांच्या संघटना व किरकोळ विक्रेते संघटना यांनी संयुक्त-पणे ग्राहकाने वापरलेले प्लास्टीक पुनर्खरेदीद्वारे गोळा करणेबाबत व्यवस्था निर्माण करणे व गोळा केलेल्या प्लास्टीक मटेरिअलची पुनर्चक्रण व विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

(क) पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या प्लास्टीकचा वापर व विक्री उपरोक्त ६ (अ) व ६ (ब) ची पुर्तता सदर सुधारित अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन तीन महिन्यांच्या आत करणे बंधनकारक राहील.

(ड) पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या प्लास्टिक उत्पादकांनी उपरोक्त ६(अ) व ६ (ब) ची पुर्तता सदर सुधारित अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन करणे बंधनकारक राहील.

(७) अनुक्रमांक ७ मध्ये पुढील बाब अंतर्भूत करण्यात येत आहे.—

महाराष्ट्र राज्यात ई-कॉमर्ससाठी लागणाऱ्या प्लास्टीक पॅकेजिंग मटेरियलला फक्त तीन महिन्यांकरिता विक्री करण्यास मुभा राहील. तथापि, प्लास्टीक पॅकेजिंग मटेरियल ऐवजी अन्य पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याची व्यवस्था तीन महिन्यात करावी. तसेच तीन महिन्यात वापरलेले प्लास्टीक मटेरियल संकलन करून, संकलित मटेरियलचे पुनर्चक्रण व विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

**५.** दिनांक २३ मार्च २०१८ च्या अधिसूचनेतील परिच्छेद ४ मध्ये अंमलबजावणीसाठी व नियमांतर्गत कारवाई करणेसाठी महाराष्ट्र अविघटनशिल कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ मधील कलम १२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत कारवाई करण्यासाठी अनुक्रमांक १० नंतर खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात प्राधिकृत करण्यात येत आहे.

अनुक्रमांक ११ :— रेल्वे, मेट्रो, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व विमानतळ प्राधिकरण यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिल डिग्गीकर,**
प्रधान सचिव (पर्यावरण).

# ENVIRONMENT DEPARTMENT

15th floor, New Administrative Building, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 30th June 2018.

*NOTIFICATION*

No. Plastic.2018/C.R.No. 24/TC-4. – WHEREAS, under the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, for regulating the manufacture, usage, sale, storage, transport of the products made from plastic and thermocol etc., the Government of Maharashtra published the Maharashtra Plastic and Thermocol Products(Manufacture, Usage, Sale, transport, handling and Storage), Notification, 2018 on 23rd March 2018, which was amended as per Notification, dated the 11th April, 2018;

AND WHEREAS, as per para 8 of the said notification, for implementation of these regulations and help in resolving any difficulty faced by implementing authorities during implementation and if required also carry-out any amendment in these regulations, the Government Resolution, dated the 22nd March 2018 constituted the Empowered Committee;

AND WHEREAS, the Empowered Committee in its meeting of the held on 30th June, 2018, resolved to make amendment in the Maharashtra Plastic and Thermocol Products(Manufacture, Usage, Sale, transport, handling and Storage), Notification, 2018 ;

NOW, THERFORE, in exercise of the power confirmed by clause (1) and (2) of Section 4 of the Maharashtra Non-biodegradable Garbage (Control) Act, 2006, the Government of Maharashtra hereby makes the following amendment in the Maharashtra Plastic and Thermocol Products(Manufacture, Usage, Sale, transport, handling and Storage), Notification, 2018 :–

**1. In Notification, dated the 23rd March 2018, in Para. 2 at Serial No. 14 and 15 the following definitions are inserted :—**

(14) “Multi-layered Packaging” means any material used or to be used for packaging and having at least one layer of plastic as the main ingredient in combination with one or more layers of material such as paper, paperboard, polymeric materials, metalized layers or aluminium foil either in the form of laminate or co-extruded structure.

(15) “Paper-Based Carton Packaging using one layer of plastic” means a container for liquid and solid food and beverages (*e.g.* milk, juice, etc.), where the primary constituent material is paper-board and which may have one or more layer of plastic, foil necessary to allow safe and hygienic consumption.

**2. In the Notification, dated the 11th April, 2018 after Clause (c) of Para. 1 is substituted as follow and additional clauses (d), (e) & (f) are inserted :—**

(*c*) PET / PETE Bottles of Drinking water, having liquid holding capacity of one litre or more, shall be printed on it, the Deposit and Refund Price of Re.1 or buyback price as decided by the Manufacturer. Drinking water PET / PETE Bottles, having liquid holding capacity of less than one litre but more than 200 ml. shall be printed on it, the Deposit and Refund Price of Rs. 2 or buyback price as decided by the Manufacturer.

(*d*) Use, sale, storage and manufacture of drinking water PET or PETE bottles of having liquid holding capacity less than 200 ml. is banned in the State.

(*e*) It is mandatory on the part of the bulk consumers of PET bottles such as hotels, marriage/ party halls, outdoor event locations, offices/institutions shall provide space for collection of plastic waste.

(*f*) It shall be the sole responsibility of the PET Bottle industries to ensure that these bottles are collected from retailers at depository and refund rate or buyback rate and are recycled.

**3. In Notification dated 23rd March 2018, Clause 2A is inserted after Clause 2 of Para 3 as follows :—**

(1) As per Plastic Waste Management Rules, 2016 issued *vide* 18th March 2016, by the Ministry of Environment, Forest and Climate Change, Government of India, manufacture and use of non-recyclable multi-layered plastic if any, should be phased out in two years' time. Since, the two years' time is over, the Manufacturers should stop use of non-recyclable multi-layered plastic immediately.

(2) The manufacturer/brand owner/producer of recyclable multi-layered and paper-based carton packaging material using one layer of plastic /Manufacturer's Association, shall diligently implement their Extended Producer's Responsibility (EPR) Plan which includes co-ordination / collaboration with existing Rag pickers / Scrap Traders, retailers for collection of plastic waste and its subsequent recycling and final disposal through their own established recycling plant or registered recyclers by establishing Producer's Responsible Organisations(PRO), which shall be responsible for 100% integral Plastic Waste Management right from collection to final disposal.

(3) Extended Producer's Responsibility (EPR) Plan of the manufacturer/brand owner/producer of multi-layered and paper-based carton packaging material using one layer of plastic shall be reviewed after three months from the date of issuance of this notification and on the basis of the outcome of review, further decision will be taken for regulation.

4. **In Clause 3 of Para 3 regarding regulation not applicable to the items mentioned in the Notification dated the 23rd March, 2018, the following items are inserted :—**

(1) In Sr. No. (i), Medical Equipment's and Medical Products are also added in addition to use of plastic for packaging of medicines.

(2) Sr. No. (ii) shall be read as it is.

(3) Sr. No. (iii) shall be read as it is.

(4) Sr. No. (iv) is substituted as follows :—

iv. Plastic material/ thermocol used for wrapping the material at the manufacturing stage or is an integral part of manufacturing shall comply the following conditions :—

a. The packaging material shall be more than 50 micron thickness ;

b. The packaging material shall be made up of minimum 20% recyclable plastic material (except for food packaging);

c. The packaging material (except for export purpose) shall be printed with manufacturer's details, type of plastic with code number and buy-back price ;

d. The manufacturers/ manufacturers' association using material for packaging shall work together and create a buy-back mechanism and diligently implement their Extended Producer's Responsibility (EPR) Plan which includes co-ordination/ collaboration with existing Rag pickers/ Scrap Traders, retailers for collection of plastic waste and its subsequent recycling and final disposal through their own established recycling plant or registered recyclers by establishing Producer's Responsible Organisations, which shall be responsible for 100% integral Plastic waste management from collection to final disposal.

(5) Sr. No. (v) shall be read as it is.

(6) **At Sr. No. (vi) following clause is inserted :—**

vi. Wholesalers and Retailers of groceries and grain products are allowed to sell groceries and grain products in sealed plastic packaging material subject to compliance of following conditions :—

a. The plastic packaging material shall be more than 50 micron thickness with a minimum weight of 2 grams. The packaging material shall be printed with manufacturer's details, type of plastic with code number and buy-back price ;

b. Manufacturing associations for retail packaging material and retailer's associations shall work to create a mechanism for the collection of the plastic through a buy-back mechanism and ensure the recycling and final disposal of the collected plastic materials ;

c. The conditions mentioned above in vi (a) and (b) shall be complied for use and sale of plastic packaging material within a period of three months from the date of issuance of this Notification ;

d. The Manufacturers shall comply with the conditions mentioned at Sr. No. vi (a) and vi (b) from the date of issuance of this Notification.

(7) **At Sr. No. (vii), following clause is inserted :—**

vii. Plastic Packaging material used for products intended for sale in the State of Maharashtra through E-Commerce shall be allowed only for three months, however, they shall develop Environmental-Friendly Alternative for packaging of materials within three months. They shall create a mechanism for the collection of the plastic packaging material used during three months and ensure the recycling and final disposal.

5. In para 4 of the Notification dated the 23rd March 2018, the officers are authorised and empowered for implementation and to take necessary legal action under the powers conferred *u/s* 12 of the provisions of the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018. In addition to this, after Sr.No.10 the following officers, are authorised.

(11) Any officers nominated by the Railway, Metro, Maharashtra Maritime Board and Airport Authorities.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIL DIGGIKAR,
Principal Secretary (Environment).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.